## दृष्टिक्षेपात तालुका

| | |
|---|---|
| • क्षेत्रफळ (चौ.किमी) ७४,४३५ | • महसूल मंडळे ५ |
| • गावांची संख्या ६७ | • जि.प.सर्कल ४ |
| • ग्रामपंचायती ६५ | • प्रा.आरोग्य केंद्रे ३ |
| • नगरपरिषद १ | • शाळांची संख्या १९० |
| • पोलीस ठाणी १ | • महाविद्यालये १० |

## खानापूर वैशिष्ट्ये

| | |
|---|---|
| **माजी कुलगुरू** | डॉ. एन.जे.पवार (ऐनवाडी) |
| **वैरण कोठार योजना** | बलवडी |
| **१०१ दिवसाचे जनावरांसाठी आंदोलन** | भाई संपतराव पवार (१२ फेब्रु २००३) |
| **गलाई व्यवसायासाठी प्रसिद्ध** | खानापूर तालुका |
| **द्राक्ष शेतीची गावे** | पूर्व खानापूर, पळशी, बलवडी, हिवरे, बेणापूर, करंजे, खानापूर, विटा परिसर |
| **नागेवाडीचे मुख्य आकर्षण** | बगाड **ग्रामदैवत** - नागनाथ |
| **पालखी शर्यत** | विटा |

## क्रांती स्मृतिवन

येरळा नदीवर बलवडी (भा.) खानापूर येथे शासनाच्या मदतीशिवाय लोकसहभाग व श्रमदानातून निसर्गाचा विनाश न करता विकास या कल्पनेतून बळीराजा धरणाची निर्मिती झाली. भाई संपतराव पवार यांनी क्रांतीकारकाच्या स्मृती वृक्षरुपाने जपण्याची कल्पना मांडली. लोकांनी क्षणाचाही विलंब न करता मुखसंमती दिली. २१ ऑगस्ट १९९२ ला जिल्हाधिकारी सुमित मलिक यांच्या हस्ते बळीराजा धरण परिसरात भूमिपूजन झाले. खडकावर माती भरून सांगली जिल्ह्यातील ४ हजार १९८ हुतात्मा क्रांतिकारकांच्या नावे वृक्ष लावून स्मारक उभारले.

३१ डिसेंबर १९९९ रोजी भाई संपत पवार यांनी येरळा काठावरील गट न-२०

Scanned by CamScanner

मधील स्वतःच्या १०० आर क्षेत्रावर कायमस्वरूपी पाणी, विहीर, बोर, वीज कनेक्शन विनामूल्य देवून भूमिपूजन केले. सौ. छाया पाटील (कामेरी) यांच्या हस्ते भूमिपूजन केले.

या क्रांती स्मृती वनात २६ हुतात्म्यांच्या खांबावर कायमस्वरूपी सभागृह उभे केले. २६ हुतात्मा खांब नसून विचाराचे कुंभच आहेत.

येथे पंड्या इंजिनिअर, रंगा गायकवाड, सुरेश पाटील, निलेश, निलाखे, विष्णू बारभट्टे, राजेंद्र पाटील या हुतात्म्यांना या वृक्षांच्या साक्षीने हुतात्म्य झाले.

## हातमाग व पावॅरलूमचे केंद्र-विटा

विटा शहरात खूप वर्षापासून कोष्टी समाजाच्या लोकांचा पारंपारिक विणकामाचा व्यवसाय आहे. विटा शहरास गेल्या ६० ते ७० वर्षाची वस्त्रोद्योगाची परंपरा आहे. डबरीमाग, हातमाग, यंत्रमाग, सेमी ॲटोमेटिक व ॲटोमेटिक यंत्रमाग आणि आता अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरलेल्या (धोट्यासहित) शटललेस लुम्सकडे वाटचाल असा या व्यवसायाचा आजपर्यंतचा प्रवास आहे.

१९०० ते १९५० पर्यंतच्या काळात डबरी मागावर लुगडी या साडीचे उत्पादन घेतले जात होते. त्यानंतर हातमाग आले. त्यावर देखील लुगडी व रंगीत साडीचे उत्पादन घेतले जात होते. हे माग हाताने किंवा पायाने चालवले जात होते. १९६० च्या सुमारास शहरात विजेवर चालणारा पहिला यंत्रमाग बसविण्यात आला. १९७४ पर्यंत शहरात यंत्रमाग वाढीची प्रक्रिया गतीने सुरू होती. मात्र केंद्राने यंत्रमागावर रंगीत साडी विणण्यास बंदी घातल्यामुळे यंत्रमागाचा व्यवसाय ठप्प झाला. यावेळी विटा यंत्रमाग संघाच्या माध्यमातून मुंबईच्या वस्त्रोद्योग महामंडळाची सफेद कापडाची बीमे पुरविण्यात आली. त्यानंतर हळूहळू या ठिकाणी ग्रे कापडाची बाजारपेठ स्थिरावली व पुन्हा एकदा यंत्रमागाचा व्यवसाय चांगला चालला व तेव्हा यंत्रमाग वाढीच्या प्रक्रियेने गती घेतली. १९९० पर्यंत व्यवसायाची वाढ सुरू होती. त्यानंतर सुताच्या दरात तेजी-मंदी, मिळणारा दर, कामगारांची कमतरता या प्रश्नांमुळे यंत्रमाग व्यवसायास उतरती कळा लागली. २००० पर्यंत हा व्यवसाय मोठ्या जिद्दीने व कष्टाने यंत्रमागधारकांनी टिकवून ठेवला त्यानंतर राज्यशासनाने काही सवलती दिल्या. खानापूर सारख्या दुष्काळी तालुक्यात रोजगार निर्मितीची क्षमता असलेला एकमेव उद्योग आहे.

## सांस्कृतिक व साहित्यिक

Scanned by CamScanner

खानापूर तालुक्याला साहित्य, संस्कृती यांनी प्रेरणा दिली. उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांचे जन्मगाव ढवळेश्वर, आजोळ देवराष्ट्रे होय. स्वातंत्र्यापूर्वी श्री.म.माटे या प्रसिद्ध लेखकाचे वडील विट्यात नोकरी करीत होते. त्यांचे बालपण विट्यात गेले. 'उपेक्षितांचे अंतरंग' या पुस्तकातून खानापूर तालुक्यातील अनेक पात्रे चमकून गेली. कवी ग.वि..दुगम गुरूजी यांनी 'रानफुले' नावाचा बालगीतांचा संग्रह प्रकाशित केला.

१९८६ पासून ग्रामीण मराठी साहित्यसंमेलनाची सुरुवात झाली. शहाबाई यादव या रेणावीच्या अशिक्षित महिला परंतु विटा परिसरातील बहिणाबाई म्हणून त्या गाजल्या. रानकवी यशवंत तांदळे यांनी आपल्या कवितांनी महाराष्ट्र गाजविला.

## खानापूर तालुका उद्योग

खानापूर तालुक्याने सोने-चांदी, पॉवरलूम, यंत्रमाग, गारमेंट व पोल्ट्री व्यवसायातून नाव कमावले आहे. महत्त्वाकांक्षांतून एम्.आय.डी.सी. ची निर्मिती झालेली आहे. तसेच इतर छोटे मोठे उद्योग भरभराटीस येत आहेत. घानवड येथे टेक्स्टाईल पार्कची निर्मिती करणेत आलेली आहे.

बायडींग वायर, रॅपीअर लूम्स, अॅटोलूम्स सुरू करण्यात आलेले आहेत. यामध्ये विविध प्रकारचे डाईंगपूर्वीचे शुटींग, शर्टींग कापड तयार करण्यात येत आहे.

## कुस्ती आखाडा

कुस्ती क्षेत्राला गतवैभव देण्याचे काम खानापूर तालुक्यातील अनेक गावांनी केले. भाळवणीचा डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील, बेणापूरचे ऑल इंडिया चॅम्पियन श्रीरंग शिंदे, पोसेवाडीचे महाराष्ट्र चॅम्पियन बळी पवार, इ. नामवंत मल्ल या तालुक्याने दिले. या तालुक्यातील बलवडी, खानापूर, बेणापूर, विटा येथील कुस्ती मैदान वर्षानुवर्षे मोठ्या प्रमाणात पार पडत आहेत. विट्याचे सुपुत्र लोकनेते हणमंतराव पाटील यांनी प्रथम विट्यात लाल मातीचा आखाडा सुरू केला. तसेच बेणापुरात बाळासाहेब शिंदे कुस्ती प्रशिक्षण संकुल बेणापूरकरांनी उभे केले आहे. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रावसाहेब शिंदे व त्यांचे सुपुत्र राजेंद्र शिंदे, शशिकांत शिंदे, संभाजी चव्हाण (बिरणवाडी), शशिकांत पाटील (पळशी), आदी जुन्यापिढीतील मल्ल नवीन पैलवान तयार करण्यासाठी अहोरात्र कष्ट घेत आहेत.

## श्री रेवणसिध्द

विट्यापासून आठ ते नऊ कि.मी. अंतरावर कराड-विजापूर रस्त्यावर रेणावी (ता.खानापूर) येथे साडेसातशे वर्षापूर्वीचे धार्मिक अधिष्ठान असलेले भव्यदिव्य

Scanned by CamScanner

उत्तराभिमुख श्री. रेवणासिद्धाचे मंदिर आहे. गर्द झाडी, गायमुख, कौल देणारा दगडी गुंड, संपूर्ण गावात मांसाहार वर्ज्य, भाकुणुकीची प्रथा अशी वैशिष्ट्ये असलेले हे स्थान आहे.

या मंदिरात विश्वाराध्य, रेवणसिद्ध, माळासिद्ध एकोदय व पंडिताचार्य या पाच आचार्यांची ठिकाणे पहावयास मिळतात. मंदिराच्या उजव्या बाजूला मरलासिद्धांचे छोटेसे मंदिर आहे. दीपमाळेजवळ विश्वाराध्याचे मंदिर आहे. नंदीच्या पाठीमागे चार तोंडाची शाळीग्रामाची पिंड आहे. पिंडीच्या समोर एक मोठा गोल दगड आहे.त्याला गुंड म्हणतात. येणारे भाविक हा दगड उचलून कौल मागतात.

रेवणसिद्ध महाराजांचे मूळ पीठ कर्नाटक राज्यातील चिकमंगळूर जिल्ह्यात आहे. रेणावी या ठिकाणी याच मंदिरासमोर १९४२ मध्ये इंग्रजांची छावणी होती. श्रावणमहिन्यातील सोमवारी व माघ वद्य अमावश्येला येथे वर्षातून दोन वेळा पाऊस-पाणी व धान्य याबाबत भाकणूक होते. ही भाकणूक ऐकण्यासाठी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. दरवर्षी महाशिवरात्रीला येथे मोठी यात्रा भरते.

रेवणसिद्ध नवनाथांपैकी एक आहेत. त्यांना सिद्धी प्राप्त झाल्याने सिद्धनाथ मंदिराच्या पश्चिमेस महालिंग स्वामींची समाधी आहे. या ठिकाणी गोमुखातून सतत तीर्थ पडत असते. हे तीर्थ रेवणसिद्ध मंदिरातून पाझरून पूर्वेला गायमुखाजवळ उगम पावते. कामधेनू व नंदीने या निमवितांची मनोभावे सेवा केली. तेच हे गायमुख होय. मंदिराच्या उत्तरेस १४ वक्या आहेत.

१९४८ मध्ये महात्मा गांधींची पवित्र रक्षा या तीर्थात विसर्जित करण्यात आली. २ ऑक्टोंबर व ३० जानेवारीला येथे गांधीवंदनाचा कार्यक्रम घेतला जातो. चैत्र महिन्यात चैत्र शुद्ध प्रतिपदा गुढीपाडव्यापासून चैत्र अमावश्येपर्यंत एक महिना खडी घालण्याची प्रथा अनेक वर्षापासून आहे. श्री रेवणसिद्धाच्या चरणी खड्या घातल्याने समस्यांचे निराकरण व अपेक्षा पूर्ण होतात.

असे हे रेणावी गावाजवळ श्री रेवणसिद्धाचे स्वयंभू स्थान आहे.

## शैक्षणिक क्रांती

खानापूर तालुक्यातील विशेषत: विट्यात ज्ञानाची गंगा खूप मोठ्या प्रमाणात विस्तृत झालेली आहे. तालुक्यात बालवाडीपासून ते उच्च शिक्षणापर्यंतची ज्ञानगंगा ओसंडून वाहू लागली आहे.

चॅरिटेबल ट्रस्ट, जीवन प्रबोधिनी महाविद्यालय, रयत शिक्षण संस्था, मॉडर्न एज्युकेशन सोसायटी, वैभव शिक्षण संस्था, सांगली शिक्षण संस्था, क्रांतिसिंह नाना

Scanned by CamScanner

पाटील, भारती विद्यापीठ या संस्थांनी शिक्षणाची दारे खुली केलेली आहेत.

## आक्रमक मल्ल चंद्रहार पाटील

चंद्रहार पाटील यांचे यश खानापूर तालुक्याचे भूषण आहे. म्हैसूल केसरी, कोल्हापूर महापौर केसरी, कामगार केसरी, वारणा केसरी, महिंद्रा केसरी, मुंबई कामगार केसरी, मध्यप्रदेश इंदौर केसरी इ. मानाचे किताब पटकाविले. सांगली जिल्ह्याला तब्बल २८ वर्षाच्या प्रतिक्षेनंतर औरंगाबादच्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत महाराष्ट्र केसरीचा बहुमान मिळवून दिला. कडेगाव येथे झालेल्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत चंद्रहार यांनी डबल महाराष्ट्र केसरीचा बहुमान मिळविला. जिल्हा परिषद निवडणुकीच्या राजकीय आखाड्यात प्रस्थापितांना चितपट केले.

Scanned by CamScanner